नि.फौ.ख.क्र.५६५/२०२१

शासन–वि– सतिश + १

नि.क्र.१२

<u>मी शपथेवर खरे सांगते की,</u>

माझे नांव – सुरज नामदेवराव देशेवार,

वय ३० वर्ष, कामधंदा– नोकरी,

राहणार– गौतम नगर, वरुड, ता. व जि. वर्धा.

......................................................................................................

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री.पठाण यांच्या मार्फत.</u>**

१. दिनांक २२.०६.२०२१ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणून आष्टा गावाजवळ बोलाविले होते. मी आरोपीला ओळखत नाही. माझे समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यात आला नाही. मला आता घटनास्थळ–जप्ती पंचनामा जो मला दाखविण्यात आला त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सूचनापत्र व घटनास्थळ–जप्ती पंचनाम्यावरील सहीस ओळखीसाठी नि.क्र. P1/PW1 व P २/PW १ अनुक्रमे देण्यात येते.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पहिल्या बयाणास मुकारला असता, सरकारी वकीलांनी उलट तपासणीच्या स्वरुपात उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २२.०६.२०२१ रोजी मला पोलीसांनी सुचनापत्र देवून घटनास्थळी आष्टा गावाच्या रोडवर बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की जेव्हा मी गेलो त्यावेळी तेथे एक जेसीबी एमएच २९ एएम १४७५ उभा होता. हे म्हणणे खरे नाही की तेव्हा माझे समक्ष फिर्यादीने पोलीसांना घटना सांगून घटनास्थळ सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की तेव्हा पोलीसांनी माझे समक्ष लाकडी बांबुची काठी जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी त्याबाबत माझे समक्ष घटनास्थळ–जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की त्यातील मजकूर वाचून त्यावर मी स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे – के.ए.घरडे वकिल तर्फे यांनी उलट तपास नाकारला.</u>**

<u>फेरतपास नाही.</u>

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृती | माझे समक्ष |
| MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.08.19 17:25:39 +0530 | MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.08.19 17:25:47 +0530 |
| (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) | (श्रीमती एम.वाय.डोईफोडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक १९.०८.२०२६ | वर्धा, दिनांक १९.०८.२०२६. |